दिनांक ३१.०३.२०१८ रोजी राज्यस्तरीय खरेदी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार रुग्णवाहिका खरेदी करण्यास मान्यता

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : रास्तख-२०१८/प्र.क्र.१४२/प्रशा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च,२०१८

**वाचा :**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभाग, क्रमांक जेएचएम-२०१८/ प्र.क्र.१२/प्रशा-१, दिनांक २८.०३.२०१८.
३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभाग, क्रमांक रास्तख-२०१८/ प्र.क्र.१३९/प्रशा-१, दिनांक ३१.०३.२०१८.
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक राज्यखस/१७-१८/ अम्बुलन्स खरेदी/बैठक इतिवृत्त/३१.३.२०१८/२०१८, दिनांक ३१.०३.२०१८.

**शासन निर्णय :-**

दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी झालेल्या राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत समितीने खालील तक्त्यात नमूद केलेल्या बाबींची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. सदर रुग्णवाहिका खरेदीबाबतचा तपशील संबंधित रुग्णवाहिकाच्या नावासमोर दर्शविलेल्या परिशिष्ठात नमूद केला आहे.

| **अ. क्र.** | **रुग्णवाहिकाचे नाव** | **परिशिष्ट क्रमांक** |
|---|---|---|
| १ | कार्डीयाक ॲम्बुलन्स विथ मेडीकल ॲन्ड इमरजंन्सी इक्युपमेंट | परिशिष्ट क्रमांक १ |
| २ | बेसीक लाईफ सपोर्ट ॲम्बुलन्स | परिशिष्ट क्रमांक २ |

**२.** उपरोक्त तक्यात नमूद रुग्णवाहिका ही खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात यावी.

१) अधिष्ठातांनी वरील रुग्णवाहिकेची खरेदी राज्यस्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या किंमतीप्रमाणेच करावी व संबंधित पुरवठादाराबरोबर आवश्यक तो वार्षिक देखभाल करार निविदेतील अटी व शर्तीनुसार करावा त्याप्रमाणे करारपत्र करुन पुरवठा आदेश द्यावेत.

२) निविदा अटी व शर्तीनुसार रुग्णवाहिकाच्या बनावटीनुसार भारतीय बनावटीचे असल्यास पुरवठा कालावधी ६ ते ८ आठवड्यांचा व परदेशी बनावटीचे असल्यास पुरवठा कालावधी ८ ते १२ आठवड्यांचा राहील.

३) सदरहू रुग्णवाहिका खरेदीकरीता येणारा खर्च संबंधित संस्थांना प्रशासकीय मान्यतेच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षांतर्गत निधीतून भागविण्यात यावा. निधीच्या माध्यमाचे सविस्तर लेखाशीर्ष संबंधित संस्थेच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

४) ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी तो खर्च करण्यात यावा.

५) रुग्णवाहिका योग्यरित्या कार्यान्वित झाल्यापासून एक महिन्याच्या आत उपयोगिता प्रमाणपत्र संचालक यांना पाठवावे व त्याची प्रत या विभागास पाठवावी.

६) रुग्णवाहिका प्राप्त होताच तिची रुग्णालयीन तांत्रिक समितीमार्फत तपासणी करुन ती टेंडर स्पेसीफिकेशनप्रमाणे व मान्य विनिर्दिष्ठांप्रमाणे असल्याची खातरजमा करुन घ्यावी व त्याचा अहवाल शासनास पाठवावा.

७) रुग्णवाहिकेबाबत वार्षिक देखभाल करार (AMC), सर्वसमावेशक करार (CMC) आणि सर्विस टॅक्स करारातील अटी व शर्तीचे तंतोतंत आणि काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी अधिष्ठातांवर राहिल.

८) रुग्णवाहिका विहित मुदतीत प्राप्त करुन घेणे आणि ती कार्यान्वित करणे याची सर्वस्वी जबाबदारी अधिष्ठाता यांचेवर राहील. विहित मुदतीत रुग्णवाहिका पुरवठा न करणा-या कंपनीविरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी.

९) सदर रुग्णवाहिकेवरील एकंदरीत खर्च अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा जास्त केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) कंपनीने पुरवठा केलेले रुग्णवाहिका मान्य विनिर्दिष्ठांप्रमाणे असल्याचा अहवाल तांत्रिक समितीने दिल्यावर आणि कंपनीने यंत्र योग्यरित्या प्रस्थापित केल्यानंतर यंत्राची ९० टक्के रक्कम कंपनीस अदा करावी.

११) कंपनीने रुग्णवाहिका समाधानकारकरित्या कार्यान्वित करुन दिल्यावर आणि आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता केल्यावरच उर्वरित १० टक्के रक्कम अदा करण्यात यावी.

१२) ही रुग्णवाहिका हाताळण्यासाठी आता व भविष्यात नवीन कर्मचारीवृंद उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

१३) रुग्णवाहिकेचा हमी कालावधी यंत्र कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पुढे दोन वर्ष राहील. २ वर्षांचा हमी कालावधी संपल्यानंतर पुढील ८ वर्षांकरीता संस्थेच्या

आवश्यकतेनुसार संस्थेकरिता मान्य किंमतीच्या ०.५ टक्के दराने वार्षिक देखभाल करार अथवा १ टक्के दराने सर्वसमावेशक देखभाल करार करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१२०४१४९४६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.03.31 22:14:07 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत :** परिशिष्ट क्रमांक १ व परिशिष्ट क्रमांक २ जोडले आहे.

प्रति,

१) महालेखापाल -१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२) जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, मुंबइ शहर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
४) अधिष्ठाता, सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७) निवडनस्ती.

## परिशिष्ट क्रमांक १

**शासन निर्णय, क्रमांक रास्तख-२०१८ / प्र.क्र. १४२/ प्रशा-१, दि. ३१ .०३. २०१८ सोबतचे परिशिष्ट क्र. १**

| | |
|---|---|
| रुग्णवाहिकेचे नाव व मॉडेल | कार्डीयाक ॲम्बुलन्स विथ मेडीकल ॲन्ड इमरजंन्सी इक्युपमेंट मॉडेल- Traveller Force Motor BSIV |

**निविदा तपशील**

सदर रुग्णवाहिकेसाठी एकूण ०२ निविदाकारांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ०१ निविदाकार ग्राहय ठरले. ग्राहय निविदाकारापैकी मेसर्स पॅरामाऊंट एन्टरप्राईज, मुंबई या निवदाकाराच्या निविदेस सदर रुग्णवाहिका आवश्यक त्या सर्व सहयंत्रासह प्रतिनग रुपये ५४,९८,५५०/- (अक्षरी रुपये चोपन्न लक्ष अठ्ठ्याण्णव हजार पाचशे पन्नास फक्त) (सर्वकरांसह) इतक्या किमतीस खरेदी करण्यास दिनांक ३१.०३.२०१८ रोजी आयोजित राज्य खरेदी समितीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.

| पुरवठादाराचे नाव | मंजूर नग | प्रतिनग किंमत | एकूण किंमत | यंत्राची बनावट | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| मेसर्स पॅरामाऊंट एन्टरप्राईज, मुंबई | ०१ | ५४,९८,५५०/- | ५४,९८,५५०/- (सर्व करासहित) | परदेशी | ८ ते १२ आठवडे |

**यंत्रखरेदीबाबतचा तपशील**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक व दिनांक | प्रशासकीय मान्यता रक्कम | निधीचे माध्यम | मंजूर नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई | जेएचएम-२०१८/ प्र.क्र.१२/प्रशा-१, दि.२८.०३.२०१८ | ५०,००,०००/- | (केंद्र पुरस्कृत खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत खासदार निधी) | ०१ | ५४,९८,५५०/- |

## परिशिष्ट क्रमांक २

### शासन निर्णय क्रमांक रास्तख-२०१८ / प्र.क्र. १४२/ प्रशा-१, दिनांक ३१.०३.२०१८ सोबतचे परिशिष्ट क्र. २

| | |
|---|---|
| रुग्णवाहिकेचे नाव व मॉडेल | बेसीक लाईफ सपोर्ट ॲम्बुलन्स मॉडेल Traveller Force Motor BSIV |

**निविदा तपशील**

सदर रुग्णवाहिकेसाठी एकूण ०३ निविदाकारांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी एकूण ०१ निविदाकार ग्राहय ठरले. ग्राहय निविदाकारापैकी मेसर्स पॅरामाऊंट एन्टरप्राईज, मुंबई या निवदाकाराच्या निविदेस सदर रुग्णवाहिका आवश्यक त्या सर्व सहयंत्रासह प्रतिनग रुपये २९,६९,९५०/- (अक्षरी रुपये एकोणतीस लक्ष एकोणसाठ हजार नऊशे पन्नास फक्त) (सर्वकरांसह) इतक्या किमतीस खरेदी करण्यास दिनांक ३१.०३.२०१८ रोजी आयोजित राज्य खरेदी समितीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.

| पुरवठादाराचे नाव | मंजूर नग | प्रतिनग किंमत | एकूण किंमत | यंत्राची बनावट | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| मेसर्स पॅरामाऊंट एन्टरप्राईज, मुंबई | ०१ | २९,६९,९५०/- | २९,६९,९५०/- (सर्व करासहित) | भारतीय | ६ ते ८ आठवडे |

**यंत्रखरेदीबाबतचा तपशील**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक व दिनांक | प्रशासकीय मान्यता रक्कम | निधीचे माध्यम | मंजूर नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई | जेएचएम-२०१८/ प्र.क्र.१२/प्रशा-१, दि. २८.०३.२०१८. | ३०,००,०००/- | (केंद्र पुरस्कृत खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत खासदार निधी) | ०१ | २९,६९,९५०/- |